**जिल्हाधिकारी, नाशिक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जाहिरात**

## मुदतवाढ जाहिरात

## (उच्च व तंत्र विभाग)

शासन निर्णय क्रमांक : वसति ५३१७ /प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांचेमार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षित गटातील ७५ विद्यार्थीनींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यांचेमार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ विद्यार्थीनींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० विद्यार्थीनींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० विद्यार्थीनींसाठी वसतिगृह सुरु करणेत आले आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षाकरीता मातोश्री मुलींचे वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विद्यार्थीनींच्या वसतिगृहाकरिता प्रवेशाची जाहिरात सारथी मुख्य कार्यालय, पुणे यांचे संकेतस्थळावर दि. ०४/१०/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली होती.

त्यास अनुसरुन उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत वसतिगृहात एकूण ५० प्रवेश जागांपैकी ४२ जागांसाठी प्रवेश निश्चिती झाली असून उर्वरीत ०८ जागा अद्याप पावेतो रिक्त आहेत. त्यामुळे आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण ऑनलाईन अर्ज करणेसाठी दि. ०५/०१/२०२५ पावेतो पुन:श्च मुदतवाढ देणेत येत आहे. रिक्त जागांच्या प्रवेशाकरीता अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या (अपवाद पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन पदविसाठी प्रवेश घेतलेल्या द्वितीय वर्षाच्या) विद्यार्थिनींसाठी खालीलप्रमाणे रिक्त जागांच्या तपशीलानुसार जाहिरात प्रसिध्द करणेत येत असून **सदर संख्या ही कमी-जास्त होऊ शकेल.**

**मातोश्री शासकीय २०० मुलींचे वसतिगृहामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे राहिल.**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ५० |
|---|---|---|
| १ | व्यवसायिक पदवी | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्राप्त निर्देशानुसार ही ५० विद्यार्थिनींची अभ्यासक्रमनिहाय विगतवारी यादी निश्चित करण्यात येईल. |
| २ | बिगर व्यवसायिक पदवी | |
| ३ | पदव्युत्तर पदवी | |
| ४ | प्रत्यक्ष प्रवेश निश्चित | ४२ |
| ५ | रिक्त जागा | ०८ |

**<u>सदर पदांना आरक्षणाचे प्रचलित शासन धोरण लागू राहील.</u>**

सारथी व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थिनीच्या प्रवेशासाठीचे आवश्यक निकष, अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दि. ०५/०१/२०२५ पर्यंत राहील.

**<u>सारथी विभागीय कार्यालय</u>**


पत्ता – बॅरेक क्र. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार नाशिकरोड, नाशिक, पिन कोड – ४२२ १०१.

संपर्क : फोन नं- ०२५३-२९९३६८९

ई-मेल : divnashiksarthi@gmail.com.

संकेतस्थळ : https://sarthi- maharashtragov.in/


सदरची जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करून पोस्टाद्वारे / प्रत्यक्ष सारथी संस्थेचे नाशिक येथील वरील पत्यावर दि. ०६/०१/२०२५ पावेतो भौतिक स्वरुपात सादर करावीत.

**<u>टीप :</u>**

१. वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा दुहेरी आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

२. वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र विद्यार्थीनींची यादी सबंधित उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन अंतिम केल्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

३. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**उपरोक्त प्रवेशाच्या जागा व धोरणांमध्ये वेळोवेळी आवश्यक बदल करणेचा अधिकार हा राखून ठेवलेला आहे.**

दि. २० /१२/२०२४
ठिकाण : नाशिक

20-12-2024

**(सुधीर खांदे)**
उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक.